# अधिसूचना

**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
गो. ते. रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ०२ डिसेंबर, २०२०.

**संदर्भ :-**

१) साथरोग अधिनियम, १९८७.

२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.

**क्रमांक :- कोरोना-२०२०/प्र.क्र.६२४/आरोग्य-५, दिनांक ०१.१२.२०२०** ज्याअर्थी, महाराष्ट्रामध्ये कोवीड-१९ साथ आटोक्यात आणण्यासाठी साथ नियंत्रण कायदा १८९७ लागू करण्यात आला आहे;

ज्याअर्थी राज्यातील काही रुग्णालये हाय रिझोल्यूशन कॉम्प्यूटराइज्ड टोमोग्राफी (एचआरसीटीद्वारे) ही चाचणी कोवीड-१९ निदानासाठी वापरत आहेत आणि या चाचणीच्या आधारे रुग्णांना कोवीड-१९ उपचार सुरु करीत आहेत;

ज्याअर्थी बऱ्याच आजारामध्ये कोवीड सदृष्य बाबी एचआरसीटीमध्ये दिसल्यामुळे चुकीचे निदान होऊन रुग्णास आवश्यक नसताना कोवीड-१९ उपचार दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे;

ज्याअर्थी केंद्र सरकार आणि जागतिक आरोग्य संघटना यांचे मार्गदर्शक सुचनांनुसार कोवीड-१९ निदान निश्चितीसाठी आरटीपीसीआर/कोवीड ॲन्टीजेन प्रयोगशाळा चाचणी अहवाल सकारात्मक असणे आवश्यक आहे;

ज्याअर्थी एचआरसीटीद्वारे निदान केलेल्या कोवीड-१९ रुग्णांची कोवीड चाचणी न झाल्यामुळे स्थानिक प्रशासनास कोवीड-१९ रुग्ण असल्याची माहीती मिळत नाही व त्यामुळे अशा रुग्णांबाबत केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियंत्रक कार्यवाही करणे शक्य होत नाही;

ज्याअर्थी एचआरसीटीद्वारे निदान केलेल्या कोवीड -१९ रुग्णांची चाचणी न केल्याने रुग्णांचे संपर्कातील व्यक्तींची माहीती स्थानिक प्रशासनास मिळत नाही;

आणि ज्याअर्थी एचआरसीटीद्वारे निदान करुन प्रयोगशाळा चाचणी न केल्यामुळे उपरोक्त कारणामुळे कोवीड-१९ चा प्रसार वाढण्याची शक्यता आहे;

त्याअर्थी साथरोग कायदा, १८९७ च्या खंड २ नुसार राज्याला मिळालेल्या अधिकारानुसार सक्षम प्राधिकारी म्हणून मी खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे :-

१) हाय रिसोल्यूशन कॉम्प्यूटराईज्ड टोमोग्राफी (एचआरसीटी) द्वारे कोवीड-१९ निदान केलेल्या प्रत्येक व्यक्तीचे नाव, संपर्क क्रमांक, पुर्ण पत्ता इत्यादी माहीती संबंधीत निदान केंद्र (डायग्नोष्टीक सेंटर ) यांनी स्थानीक प्रशासनास देणे बंधनकारक राहील. यासाठी प्रत्येक नगरपालिका / महानगरपालिका यांना स्वतंत्र कक्ष तयार करेल.

२) रुग्णांस ज्या रुग्णालयातून एचआरसीटीसाठी संदर्भीत करण्यात आले आहे, तो रुग्णालय प्रमुख सुध्दा एचआरसीटीद्वारे संशयीत / निदान केलेल्या व्यक्तींचे संपूर्ण नाव, संपर्क क्रमांक / पत्ता इ. माहीती स्थानीक प्रशासनाने स्थापन केलेल्या कक्षाला देईल.

३) ज्या रुग्णालयात रुग्ण दाखल आहे त्या रुग्णालय प्रमूखाने रुग्णाचा एचआरसीटीमध्ये कोवीड निदान झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर लगेचच संबधित रुग्णाची आयसीएमआर मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडून आरटीपीसीआरद्वारे कोवीड चाचणी २४ तासांचे आत करुन घेणे बंधनकारक राहील.

४) स्थानीक प्रशासन एचआरसीटीद्वारे निदान झालेल्या रुग्णांची माहीती मिळताच रुग्ण दाखल असलेल्या रुग्णालयांशी संपर्क साधून रुग्णांची आरटीपीसीआर चाचणी करण्यात आली असल्याची खातरजमा करील. आरटीपीसीआर चाचणी अहवाल सकारात्मक आल्यास केंद्र व राज्य सरकारच्या मार्गदर्शक सुचनानुसार कोवीड-१९ साथ नियंत्रणांसाठी निकट संपर्कातील व्यक्तींचा शोध घेऊन त्यांची कोवीड-१९ साठीची चाचणी करावी व लक्षणानुसार अलगीकरण, विलगीकरण व उपचार करेल.

या अधिसुचनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर संचालक, आरोग्य सेवा-२, पुणे, जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी आणि महानगरपालिकास्तरावर महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
६) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई. (सर्व)
८) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
९) आयुक्त (आरोग्य सेवा) व अभियान संचालक, एनएचएम, मुंबई.
१०) धर्मदाय आयुक्त, एम.एस. मुंबई.
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य विमा संस्था, वरळी, मुंबई.
१२) सर्व विभागीय आयुक्त.
१३) सर्व जिल्हाधिकारी.
१४) सर्व महानगरपालिका आयुक्त.
१५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१६) संचालक, आरोग्य सेवा-एक/दोन, मुंबई / पुणे.
१७) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व).
१८) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
१९) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
२०) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व).
२१) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
२२) जिल्हा हिवताप अधिकारी (सर्व).
२३) मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
२४) सर्व सह सचिव / उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५) प्रधान सचिव यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६) सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७) निवड नस्ती (आ-५).